शोधप्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ : जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव)

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा

प्रस्तावित आराखडा

: संशोधक :

मारोती जगजेराव डोईफोडे

जिल्हापरिषद प्रशाला, ताडकळस

ता.पुर्णा जि.परभणी

मो.९९२११०१०८८

: मार्गदर्शक :

डॉ. निलेश एकनाथराव लोंढे

मराठी विभागप्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

ऑगस्ट २०२३

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ : जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव)

अनुक्रमणिका

प्रास्ताविक : 2

विषय निवडीची भूमिका : 5

संशोधनाची व्याप्ती : 6

संशोधनाची मर्यादा : 7

संशोधनाची गृहितके : 7

संशोधनाची साधने : 8

संशोधन पद्धती : 8

संशोधनाची उद्दिष्टे : 9

संशोधनाची प्रकरण रूपरेषा..........................10

संदर्भ ग्रंथसूची : 11

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ: जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव)

प्रास्ताविक :

1991 मध्ये भारताने जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण यांचा स्वीकार करून आपल्या आर्थिक धोरणांना नवे रूप दिले. त्याचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर अधिक झाला. जीवनाकडे बघण्याचा सामान्य माणसाचा दृष्टिकोन बदलून गेला. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी करावी लागणारे धडपड करूनही त्याच्या समस्या वाढतच गेल्या. साहित्य हे समाजाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. जागतिककरणाच्या रेट्यातून साहित्यही सुटले नाही.

साहित्यावर त्याचा परिणाम होऊन नव्या अंगाने ते लिहिले जाऊ लागले. माणसाच्या जगण्याचा मूलभूत प्रश्न साहित्य मांडू लागले. मराठीत जागतिकीकरणांनी स्थित्यंतर घडून आल्याचे जाणवू लागले. त्यामुळे हा विषय वगळून आपल्याला नव्या वाङमयीन, सांस्कृतिक स्थित्यंतरचा विचार करता येणार नाही. कारण सामाजिक, राजकीय आणि साहित्य क्षेत्रासह सर्वच जीवन या विषयाने प्रभावित झाले आहे. जागतिकीकरणामुळे आपल्या समग्र अशा सांस्कृतिक आकृतीबंधाला नवा आकार दिल्यामुळे एका नव्या संस्कृतीचा उदय झाला आहे. ही संस्कृती तंत्रज्ञानाने व्यापलेली असल्यामुळे आपले सांस्कृतिक वैविध्य आणि भाषा व साहित्यावर याचा मोठा परिणाम झाला आहे. या परिणामाची चर्चा सार्वत्रिक स्वरूपात वेगवेगळ्या माध्यमातून होत आली आहे. विशेषतः मराठी साहित्याच्या क्षेत्रात तर ही चर्चा विविधांगी स्वरूपाची राहिली आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्याचे क्षेत्र पार ढवळून निघाले आहे हे मात्र खरे! या जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आपल्या अवतीभोवती ज्या काही समस्या दिसतात. मग त्या वैयक्तिक स्वरूपाच्या किंवा कौटुंबिक स्वरूपाच्या असोत अथवा सामाजिक असोत त्यांची प्रतिबिंबे साहित्यात पडणे

साहजिकच. किंबहुना असेही म्हणता येईल साहित्यिकांच्या भागधेयचा तो एक महत्त्वाचा घटक आहे. जागतिकीकरणाचा परिणाम सर्वात जास्त कविता या वाङ्मय प्रकारावर झाल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या जाणिवा, संवेदना काव्यातून प्रकट होऊ लागल्या. त्याचबरोबर आशय व तंत्राच्या अंगाने झालेले बदल सहज लक्षात येतात. कविता या वाङ्मयांबरोबरच कथा, नाटक व कादंबरी या प्रकारावरही जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. मराठी कथेनेही झालेल्या स्थित्यंतरांची नोंद ठळकपणे घेतली. जागतिकीकरणामुळे मानवाचे जीवन गुंतागुंतीचे बनले. नव्या जाणीव निर्माण झाल्या त्यामुळे मराठी कथा नवा चेहरा, नवे अंतरंग घेऊन पुढे येऊ लागली. त्याचा जागतिकीकरणाच्या प्रभावाची इ.स. 1991 नंतरच्या काळात मराठी कथेत प्रतिबिंबे उमटली. तरीही प्रभावाचे अनेक पैलू अलक्षितच आहेत. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने "जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ : जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव) यांच्या कथेचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

विशेष संदर्भ म्हणून मराठी वाङ्मय प्रवाहातील वेगवेगळ्या अंगा
ने लिहिणाऱ्या प्रातिनिधिक कथाकारांच्या कथेचा अभ्यास होणार आहे

आसाराम लोमटे हे 2000 नंतरचे अत्यंत महत्त्वाचे कथाकार आहेत. ते ग्रामीण जीवनातील व्यामिश्रिता टिपणारे कथाकार म्हणून ओळखले जातात.

जागतिकीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे आज खेडे बदलून गेली आहेत. माणसांची वृत्ती बदलली, संस्कृती बदलली, माणसाच्या जगण्याच्या शैलीतही अमुलाग्र बदल झाला परंतु खेड्यातील प्रश्न आहेत तसेच आहेत.

ग्रामीण समाजाच्या जीवनशैलीमध्ये झालेले व्यापक बदल त्यांनी सशक्त व वस्तुनिष्ठरीत्या आपल्या कथांतून प्रकट केले आहेत. जागतिकीकरणानंतरची मराठी

कथा म्हणून त्यांच्या कथेचा विशेष अभ्यास होणार आहे. ग्रामीण कथेबरोबरच दलित कथेतही जागतिकीकरणामुळे अमुलाग्र बदल झाला. त्या अनुषंगाने दलित साहित्यात उच्च स्थान प्राप्त असणारे जी.के ऐनापुरे यांच्या कथांचा अभ्यास होणार आहे. जागतिकीकरणाने मानवी जीवनात उलथापालथ होऊन माणसाचे जगणे, माणूसपण कवडीमोल झाले आहे. जी.के. ऐनापुरे यांची कथा मात्र माणूसपणाचा धागा घट्ट करण्याचे काम करत आहे.

जागतिकीकरणाने नवी गती, नवे पेच, नवे आजार घेऊन आले या प्रश्नांना, आजाराला थेट भिडणारी कथा किरण गुरव यांनी लिहिली आहे.

खेड्यापाड्यात घुसलेल्या नव्या वृत्ती प्रवृत्ती, राजकारणाने घेतलेले नवे वळण, गावाचे ढासाळतेपण, तरुणांची बदललेली मानसिकता, नात्यात निर्माण झालेले अभाव, जातीच्या अहंकाराचे तीक्ष्ण झालेले कंगोरे या कथेच्या केंद्रस्थानी आहेत. हे सर्व जागतिकीकरणानंतरच्या बदलत्या समाज जीवनाचे वास्तव आहे.

एखादा कथाकार अनेक आशय सूत्रांची, रचनेच्या कथनांच्या विविध पातळ्यांची अशी काही व्यामिश्र बंदिश रचतो की वाचकाने थक्क व्हावं.

जयंत पवारांच्या कथेच्या मुळाशी मानवी अस्तित्व आणि दुःख याचं नातं काय आहे हा सनातन प्रश्न आहे.

जयंत पवारांच्या कथेतून महानगरीय जाणीवा व्यक्त होताना दिसून येतात. तर मेघना पेठे यांनी सामाजिक संकेताचे बांध तोडून जगणाऱ्या स्त्रियांचे भाव विश्व उलगडत पुरुषातील माणसाला भानावर राहणाऱ्या कथा आहेत. स्त्रीचे जगणे त्यांनी वेगवेगळ्या कोनातून निरखले. कुटुंबात राहून उंबऱ्या बाहेरच्या आयुष्य अनुभवणारी स्त्री, समाजाने घालून दिलेल्या चौकटी बाहेर ठेवणारी स्त्री त्याने त्याच संवेदनशिलतेने चित्रित केली. हे चित्रण करताना अभिव्यक्तीचे अलिखित संकेत मोडले. चौकटी बाहेर जगणारी स्त्री कायमच बंडखोर असते.

किरण गुरव हे जागतिकीकरणानंतर भारतातील शहरच नव्हे तर गावाकडचे ही समाजवास्तव बदलतं याची नोंद घेणाऱ्या कथा लिहिणारे कथाकार आहेत. स्वतःचा भवताल, भोवतालातल्या माणसाचं जगणं, त्यांचा अवकाश जागतिकीकरणाने त्यांच्यापुढे उभे केलेले पेच, उसवलेल्या नात्याची लिपी, त्यांचं विस्कटलेलं वास्तव जसेच्या तसे चितारणारा लेखक म्हणून किरण गुरव कथा महत्त्वाची आहे.

अशा मराठी कथा वाङमयातील वेगवेगळ्या अंगाने लेखन करणाऱ्या कथाकरांच्या कथेचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

विषय निवडीची भूमिका :

जागतिकीकरणाने मराठी माणसाचे जीवन अंतरबाहय ढवळून निघाले आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आपल्या अवतीभोवती अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. काही चांगले तर काही वाईट स्वरूपाचे बदलही होत आहेत. या अनुषंगाने वाचनाच्या आवडीतून मराठी साहित्यातील अनेक कलाकृती आणि वाङमयीन प्रवाहाच्या अनुषंगाने झालेले लेखन वाचण्यात आले. साहित्यिक, लेखक, विचारवंत व समीक्षकांच्या अभ्यासपूर्ण विवेचनाच्या आकलनातून मराठी साहित्यातील अनेक प्रकारांपैकी कथा हा साहित्यप्रकार अधिक जवळचा वाटायला लागला. वाङमयीन चळवळी, राजकीय स्थित्यंतरे, सामजिक परिवर्तने यांच्या अनुषंगाने कथा बदलत गेली. 1991 नंतर मात्र जागतिकीकरणामुळे साधे, सोपे, सरळ वाटणारे मानवी जीवन अधिकच गुंतागुंतीचे बनत गेले. या गुंतागुंतीच्या जीवनाचा मी एक घटक असल्यामुळे या व्यामिश्र जीवनाचा शोध घेण्याची जिज्ञासा किंवा कुतूहल निर्माण झाले. म्हणून संशोधनासाठी मी "जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास." (विशेष संदर्भ : जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव) हा विषय निवडला आहे.

जागतिकीकरणानंतर महानगरीय जीवन, ग्रामीण शेतकरी व शेतमजुराचे जीवन, मध्यमवर्गीयांचे जीवन, दलित व स्त्रियांचे जीवन अधिकच व्यामिश्र स्वरूपाचे

बनले. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जी माहिती प्रसारित होऊ लागली त्यामुळे लोकांच्या परंपरा, श्रद्धा आणि संस्कृतीला हादरे बसले. सामाजिक स्थैर्याला, सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला. माणसात चंगळवादी प्रकृती वाढली. मानवी समाज मूल्यांची पडझड समकालीन काल तत्वाच्या संदर्भात वरील कथाकारांनी आपल्या कथेतून मांडली आहे. जीवनातील समस्यांना निर्भीडपणे कथेतून अविष्कृत करून शोषणमुक्त मानवतावादी नवसमाजाची स्वप्न पाहणारी कथा लेखक मंडळींची जीवनाशी असलेली नाळ घट्ट दिसते. अशा या कथालेखकांच्या कथेचा अभ्यास करून त्यातील मानवी मूल्ये, वाङमयीन मूल्ये शोधण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची व्याप्ती खालील प्रमाणे असेल

1) **जयंत पवार** - फिनिक्सच्या राखेतून उठला मोर.
(साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 2012),
वरन भात लोन्चा नी कोन नाय कोन्चा (2015)

2) **जी.के. ऐनापुरे** - झिंझुरडा (2012)
सर्पसावल्या (खंगोल 2010),
स्कॉलर ज्यूस (2016),
निकटवर्तीय सूत्र,
चिंच पोकळी

3) **आसाराम लोमटे** - इडा पीडा टळो (चौथी आवृत्ती 2017),
आलोक, (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 2016),
वाळसरा (2022)

4) **किरण गुरव** - बाळूच्या अवस्थांतरची डायरी
(साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 2021)

राखीव सावल्यांचा खेळ,

श्रीलिपी,

क्षूधा शांती भुवन

5) **मेघना पेठे** - आंधळ्याच्या गायी (2000),

हंस अकेला (1997)

या कथाकऱ्यांच्या कथांच्या आधारे संशोधन करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन विषयातील आशय मूल्यांचा अविभाज्य घटक असल्यामुळे संशोधनात सुलभता, नेमकेपणा आणि अचूकता येण्यासाठी विषयाच्या कक्षा किंवा मर्यादा घालून घ्याव्या लागतात.

जागतिकीकरण एक व्यापक संकल्पना असल्याने विस्तार भयास्तव संशोधनाच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधकाने कथेचा अभ्यास करताना जागतिकीकरणानंतरच्या पाच वेगवेगळ्या प्रकृतीच्या जयंत पवार, जी. के ऐनापुरे, आसाराम लोमटे, किरण गुरव, मेघना पेठे या कथाकरांच्या कथा अभ्यासाची मर्यादा घालून घेतलेली आहे.

संशोधनाची गृहितके :

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने एक संशोधक अभ्यासक म्हणून संशोधन प्रबंधासाठी खालील गृहीतके मांडून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

1) जागतिकीकरणानंतर कथेतून सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील अस्वस्थता अधोरेखित होते. त्यामुळे कथा निर्मितीची प्रक्रिया व सृजनशोध घेणे आवश्यक आहे.

2) खाऊजा संस्कृतीमुळे मानवी भ्रष्टाचार, नीती मूल्याची घसरण, अशांतता, बाजारीकरण, जातवर्ग व्यवस्था, जागतिकीकरणातून आलेले कंगालपण,

संवादहीनता व चंगळवादी प्रवृत्ती या स्वकेंद्रीत वृतीचे समकालीन समाज वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण कथेतून उमटलेले आहे. त्या संबंधाने धांडोळा घेणे गरजेचे आहे.

3) जागतिकीकरणानंतर मराठी कथेत आशय अनुरूप कथेच्या अभिव्यक्ती मध्ये बदल झाला आहे.

4) कथाकारांच्या साहित्यिक दृष्टिकोन व भाषाशैलीमध्ये काल तत्त्वाच्या संदर्भात बदल दिसून आला आहे.

5) जागतिकीकरणाच्या प्रभावाने कथानक, पात्रे आणि कथेतील संघर्ष बिंदूमध्ये परिवर्तन झाले आहेत.

संशोधनाची साधने :

1) प्रस्तुत संशोधनासाठी जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, किरण गुरव, मेघना पेठे यांचे प्रकाशित मूळ कथा संग्रह आधारभूत साहित्य म्हणून वापर करण्यात येईल.

2) वाङ्मयीन अभ्यासकांची चर्चा करून त्यांच्याकडून जागतिकीकरणानंतरच्या मराठी कथेविषयी मिळालेली माहितीची वस्तुनिष्ठपणे नोंद घेण्यात येईल.

3) ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ तसेच इतर आवश्यक त्या ग्रंथाचा वापर संशोधनाच्या गरजेप्रमाणे करण्यात येईल.

4) नियतकालिके, विशेषांक यातील उपयुक्त लेख, इंटरनेटवरील लेख, ब्लॉग, स्फुटलेखन त्यांची विश्वासार्हता पडताळून आणि गुणवत्ता विचारात घेऊन संशोधन कार्यासाठी वापरण्यात येईल.

संशोधन पद्धती :

कोणत्याही संशोधकाला संशोधनाची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी आणि संशोधन शास्त्र शुद्ध होण्यासाठी संशोधन पद्धतीची आवश्यकता असते. प्रस्तुत शोध संशोधनात प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोतांचा योग्यरित्या वापर करण्यात येईल.

संशोधकास निरीक्षणात्मक, मुलाखत, आस्वादात्मक, विश्लेषणात्मक, प्रसंगी तौलनिक संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती व इंटरनेट वरील साहित्य या पद्धतीचा अवलंब करायचा असून जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" या संशोधनात्मक शोधप्रबंधाच्या अनुषंगाने संशोधकाने काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत शोध आराखड्याची मांडणी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

1) जागतिकीकरणानंतर मराठी कथेत झालेले बदल, आशय आणि अभिव्यक्तीच्या स्वरूपात अभ्यासणे.

2) समकालीन परंतु विविध प्रवाहांचा (ग्रामीण, नागरी, दलित व स्त्रीवादी) प्रातिनिधिक कथाकरांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

3) भारताने स्वीकारलेले खुले आर्थिक धोरण, खाऊजा धोरणाचा परिणाम, मराठी कथेवर एकत्रित जाणवतो का? याचाही शोध घेणे.

4) महानगरीय व नागरी, स्त्रीवादी व दलित, तसेच मध्यमवर्गीय जगण्याचे ताण तणाव कथेतून साकारलेल्या परिवर्तनशील जीवनाचा शोध घेणे.

5) जागतिकीकरणानंतर मराठी कथेतील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप व भाषाशैलीचा शोध घेणे.

6) जागतिकीकरणानंतर कथेतून प्रकट होणाऱ्या जीवनानुभवाची तौलनिक पद्धतीने चिकित्सा करणे.

7) जागतिकीकरणानंतरच्या कथांमधून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय स्वरूपाचे बदलते चित्रण समोर आलेले आहे. त्याचा शोध घेऊन मराठी कथेवर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.

८) कथा वाङमयातील आकृती बंद सांभाळत कथाकरांनी आपली प्रयोगशीलता प्रतिभाशक्ती कशी आजमावली हे सकारण समजून घेणे. या पैलूवर निवडक कथाकारांच्या कथा लेखनाचे अभ्यासपूर्वक विवेचन करणे.

संशोधनाची प्रकरण रूपरेषा

"जागतिकीकरणानंतरची मराठी कथा एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ : जयंत पवार, जी.के. ऐनापुरे, आसाराम लोमटे, मेघना पेठे व किरण गुरव) या संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकरण निहाय रूपरेषा खालील प्रमाणे

प्रकरण पहिले : जागतिकीकरण, स्वरूप व पार्श्वभूमीचा मराठी साहित्यावरील प्रभाव

प्रस्तुत प्रकरणात जागतिकीकरणाच्या स्वरूपाविषयी व पार्श्वभूमीच्या अंगाने मराठी साहित्यावरील प्रभावाचा अभ्यास मांडण्यात येईल

प्रकरण दुसरे : कथा वाङमयांचा परामर्श व कथाकरांचा परिचय.

या प्रकरणात मराठी साहित्यातील कथा वाङमयांचा थोडक्यात परामर्श व कथा वाङ्मयाची पार्श्वभूमी सांगून विविध प्रवाहातील कथाकारांच्या कथेचा परिचय स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : जागतिकीकरणानंतर मराठी कथेतील बदलते व्यक्तिचित्रण

प्रस्तुत प्रकरणांमध्ये इ.स. 1991 नंतरच्या निवडक कथाकारांच्या कथांमधून चित्रित झालेल्या व्यक्तीचित्रणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण चौथे: जागतिकीकरणानंतर मराठी कथेच्या शैलीत झालेला बदल

जागतिकीकरणानंतर मराठी भाषेपुढे अनेक संकट निर्माण झाली आहेत. बदलत्या भाषिक संस्कारामुळे कथेमधून आलेल्या भाषाशैलीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : जागतिकीकरणानंतर मराठी कथेतील जीवन संघर्षाचे स्वरूप

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे मानवाचे जीवन गुंतागुंतीचे व संघर्षाचे बनले आहे. या बदलत्या जीवन संघर्षाला अधोरेखित करणारी कथा व बदलते समाजजीवनाचे वास्तव, संघर्षाचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : जागतिकीकरणानंतरच्या कथेतील समाजजीवन व लोकसंस्कृती.

या प्रकरणांमध्ये निवडलेल्या कथाकारांच्या कथांमधून व्यक्त होणारे समाजजीवन, लोकसंस्कृती, सण-उत्सव त्याद्वारे बदलत जाणारे मराठी कथेतील समाज जीवनाचा आढावा घेण्यात येईल

प्रकरण सातवे : जागतिकीकरणानंतरच्या कथेतील आशय आणि अभिव्यक्तीचे स्वरूप.

या प्रकरणांमध्ये निवडलेल्या कथाकारांच्या कथांचा आशय आणि अभिव्यक्तीचे प्रयोग त्या आधारे बदलत जाणारे मराठी कथेचे स्वरूप याचा आढावा घेण्यात येईल

प्रकरण आठवे : उपसंहार व निष्कर्ष

सदरील प्रकरणात एकूण प्रकरणाचा सारांशरुपी उपसंहार मांडून हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी केली जाणार आहे.

संदर्भ ग्रंथसूची :

1) संपादक वळे वासुदेव, जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव, जळगाव प्रशांत पब्लिकेशन्स, 2014.

2) कांबळे उत्तम, जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न.

3) संपादक शोभणे रवींद्र, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य.

4) प्रा. डॉ. हावरे राजेंद्र, जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्य.

5) संपादक कोत्तापल्ले नागनाथ, भगत दत्ता, जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य (डॉ. प्रल्हाद लुलेकर गौरव ग्रंथ)

6) संपादक डॉ. गायकवाड शरद, डॉ शिंदे सुनील, जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, (प्रा.डॉ.नलिनी महाडिक यांचा गौरव ग्रंथ)

7) बांदेकर प्रवीण दशरथ, जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने, संपादक एकनाथ पाटील,नागनाथ प्रकाशन इस्लामपूर

8) प्रा. नेमाडे भालचंद्र, साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, लोक वाङमयगृह, मुंबई.

9) मालसे सं.ग., शोधनिबंधाची लेखन पद्धती, लोक वाङमयगृह, मुंबई, आवृत्ती चौथी 2008.

10) हातकणंगलेकर म.द., मराठी कथा : रूप आणि स्वरूप,श्री विद्या प्रकाशन पुणे.

11) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.

12) संपादक जोशी सुधा, मराठी कथा : विसावे शतक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

संशोधक

मारोती जगजेराव डोईफोडे
जिल्हापरिषद प्रशाला, ताडकळस
ता.पुर्णा जि.परभणी

मार्गदर्शक

डॉ.निलेश एकनाथराव लोंढे
मराठी विभागप्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी